आर.सी.सी.क्र.३४७/२०२५

निशाणी क्र. 40

## आरोपीचा फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३ प्रमाणेचा जबाब

आरोपीचे नाव :- संतोष बाबुराव भालेराव,
वय :- ५२ वर्षे,
राहणार :- वडाळा महादेव, ता.श्रीरामपुर, जि. अ.नगर.

| | |
|---|---|
| प्रश्न १ | तुम्ही सरकार पक्षाचा पुरावा ऐकला आहे का ? |
| उत्तर | होय |
| प्रश्न २ | तुम्हाला विचारण्यात आलेल्या कोणत्याही प्रश्नांची उत्तरे देणे तुमच्यावर बंधनकारक नाही, परंतु तुम्ही दिलेली उत्तरे तुमच्या विरूध्द पुरावा म्हणुन वापरली जातील? |
| उत्तर | होय |
| प्रश्न ३ | **साक्षीदार क्र.२ संदीप वाल्मीक बढे,** यांच्या साक्षीमध्ये असे आले आहे की, ते फिर्यादी सोमनाथ गोपीनाथ शिंदे यांना ओळखतात, ते क्लिनर होते, याबाबत तुम्हास काय सांगायचे आहे ? |
| उत्तर | खोटे सांगत आहे |
| प्रश्न ४ | सदर साक्षीदाराच्या साक्षीमध्ये पुढे असे आले आहे की, घटना दि. २६/०६/२०२४ रोजी सायंकाळी साडेचार वाजता घोडेगाव शनिशिंगणापुर सरकारी कार्यालयाच्या तळ्यासमोर घडली होती, याबाबत तुम्हास काय सांगायचे आहे ? |
| उत्तर | खोटे आहे |
| प्रश्न ५ | सदर साक्षीदाराच्या साक्षीमध्ये पुढे असे आले आहे की, त्यादिवशी तो व सोमनाथ शिंदे असे मिळुन दुध ट्रक क्रमांक एम.एच. १७ बी. डी. ६१८३ घेवुन नांदेडला जात होते, याबाबत तुम्हास काय सांगायचे आहे ? |
| उत्तर | खोटे सांगत आहे. |
| प्रश्न ६ | सदर साक्षीदाराच्या साक्षीमध्ये पुढे असे आले आहे की, त्यादिवशी ते जात असताना सरकारी तळ्यासमोर घोडेगाव शनिशिंगणापुर रस्त्यावर समोरुन ट्रक आला व तिने त्यांच्या ट्रकला समोरासमोरुन धडक दिली, याबाबत तुम्हास काय सांगायचे आहे ? |
| उत्तर | खोटे आहे |
| प्रश्न ७ | सदर साक्षीदाराच्या साक्षीमध्ये पुढे असे आले आहे की, सदर धडकेमुळे |

| | |
|---|---|
| | त्याच्या डोक्याला, छातीला व पायाला मार लागला, तसेच त्याच्या सोबत असलेले सोमनाथ शिंदे यांना मुका मार लागला, त्यानंतर त्या दोघांना सरकारी दवाखान्यात नेवुन उपचार केले, याबाबत तुम्हास काय सांगायचे आहे ? |
| उत्तर | खोटे आहे |
| प्रश्न ८ | सदर साक्षीदाराच्या साक्षीमध्ये पुढे असे आले आहे की, सदर अपघातामध्ये त्याच्या ट्रकचे नुकसान झाले होते, घोडेगाव येथील सरकारी दवाखान्यातुन आल्यानंतर त्यांना शेळके हॉस्पीटल संगमनेर येथे दाखल केले, याबाबत तुम्हास काय सांगायचे आहे ? |
| उत्तर | खोटे आहे |
| प्रश्न ९ | **साक्षीदार क्र.३ सोमनाथ गोपीनाथ शिंदे,** यांच्या साक्षीमध्ये पुढे असे आले आहे की, तो व संदीप बडे असे मिळुन ट्रकवर अनुक्रमे क्लिनर व चालक असे म्हणुन होते, त्यांच्या ट्रकचा क्रमांक एम.एच.१७ बी. डी. ६१८३ असा होता, ते दुध घेवुन ट्रॅकर खाली करण्यासाठी संगमनेर ते नांदेड जात होते, याबाबत तुम्हास काय सांगायचे आहे ? |
| उत्तर | खोटे आहे |
| प्रश्न १० | सदर साक्षीदाराच्या साक्षीमध्ये पुढे असे आले आहे की, समोरुन येणा-या ट्रक क्रमांक एम.एच. १७ बी.डी. ८१८१ या चौदा चाकी टॅकरला वेग आवरला नाही व तुम्ही त्यांच्या ट्रकला समोरुन धडक दिली, तसेच एम.एच. १७ बी.डी. ८१८१ हा ट्रक नागमोडी वेगाने त्यांच्याकडे आला, त्याबाबत तुम्हास काय सांगायचे आहे ? |
| उत्तर | खोटे आहे |
| प्रश्न ११ | सदर साक्षीदाराच्या साक्षीमध्ये पुढे असे आले आहे की, सदर धडकेमुळे त्यांचा ट्रक घोडेगाव ग्रामपंचायतीच्या विहीरीजवळ पलटी झाला, त्यामुळे त्यांना दुखापत झाली, संदीप बडे याला डोक्याला, हाता-पायाला मार लागला व त्याला कंबरेला व मांड्याला मुका मार लागुन सुज आली, त्याबाबत तुम्हास काय सांगायचे आहे ? |
| उत्तर | खोटे आहे |
| प्रश्न १२ | सदर साक्षीदाराच्या साक्षीमध्ये पुढे असे आले आहे की, सदर धडकेमुळे त्यांचे केबिन पुर्ण दबल्या गेले, चेसीस बेंड झाली व मागिल डब्बा दबल्या |

| | |
|---|---|
| | गेला व दुधाचे नुकसान झाले, त्याबाबत तुम्हास काय सांगायचे आहे ? |
| उत्तर | खोटे आहे |
| प्रश्न १३ | सदर साक्षीदाराच्या साक्षीमध्ये पुढे असे आले आहे की, तेथील लोकांनी त्यांना घोडेगाव येथील ग्रामीण रुग्णालयात नेले, त्याठिकाणी त्यांना उपचार देवुन नंतर त्यांना नातेवाईकांनी संगमनेर येथे पुढील उपचाराकामी शेळके हॉस्पीटल येथे नेले, त्याबाबत तुम्हास काय सांगायचे आहे ? |
| उत्तर | खोटे आहे |
| प्रश्न १४ | सदर साक्षीदाराच्या साक्षीमध्ये पुढे असे आले आहे की, सदरची घटना दि. २६/०६/२०२४ रोजी सांयकाळी साडेचार वाजता घडली, त्याबाबत तुम्हास काय सांगायचे आहे ? |
| उत्तर | खोटे सांगत आहे |
| प्रश्न १५ | सदर साक्षीदाराच्या साक्षीमध्ये पुढे असे आले आहे की, दुस-या दिवशी दि. २७/०६/२०२४ रोजी त्याने सोनई पोलिस स्टेशन येथे फिर्याद दाखल केली, सदर फिर्याद निशाणी २२ वर त्यांनी शाबीत केली आहे, त्याबाबत तुम्हास काय सांगायचे आहे ? |
| उत्तर | खोटी फिर्याद दाखल केली |
| प्रश्न १६ | सदर साक्षीदाराच्या साक्षीमध्ये पुढे असे आले आहे की, धडक देणारी गाडी कोण चालवित होते हे त्यांना माहित नाही, तसेच धडक देणा-या व्यक्तीबद्दल मला माहिती मिळाली नाही, त्यांना धडक देणा-या व्यक्तीची माहिती न कळण्याचे कारण म्हणजे ते संगमनेर येथील रहिवाशी आहे व ते दवाखान्यात होते, त्याबाबत तुम्हास काय सांगायचे आहे ? |
| उत्तर | माहिती नाही |
| प्रश्न १७ | सदर साक्षीदाराच्या साक्षीमध्ये पुढे असे आले आहे की, धडक देणारा व्यक्ती घटनेच्या वेळी त्यांनी पाहिला नाही कारण त्याच्या तोंडाला रुमाल बांधलेला होता, त्याने धडक देणारा गाडी क्रमांक पाहिला व उपचार कामी गेला, त्याबाबत तुम्हास काय सांगायचे आहे ? |
| उत्तर | खोटे आहे |
| प्रश्न १८ | **साक्षीदार क्र.४ मंजाबापू मारुती तांबे,** यांच्या साक्षीमध्ये पुढे असे आले आहे की, पोलिसांनी त्यांना पंचनाम्यासाठी बोलविले होते, ते रस्त्याने |

| | |
|---|---|
| | जाताना सोनई-घोडेगाव रोवर अपघात झाला होता, त्यावेळी पोलिसांनी त्यांना बोलवुन घेतले होते, त्याबाबत तुम्हास काय सांगायचे आहे ? |
| उत्तर | खोटे आहे |
| प्रश्न १९ | सदर साक्षीदाराच्या साक्षीमध्ये पुढे असे आले आहे की, सदरचा पंचनामा सोनई-घोडेगाव पुलाजवळ अपघात झालेल्या ठिकाणी झाला, सदरचे अपघ ात ग्रस्त ठिकाण सोनई-घोडेगाव रोडवर ग्रामपंचायतीच्या विहीरीजवळ होते, त्याबाबत तुम्हास काय सांगायचे आहे ? |
| उत्तर | खोटे आहे. |
| प्रश्न २० | सदर साक्षीदाराच्या साक्षीमध्ये पुढे असे आले आहे की, त्यांनी सदरील घ टनास्थळ पंचनामा निशाणी २४ वर शाबीत केला आहे, त्याबाबत तुम्हास काय सांगायचे आहे ? |
| उत्तर | खोटा पंचनामा केला आहे. |
| प्रश्न २१ | सदर साक्षीदाराच्या साक्षीमध्ये पुढे असे आले आहे की, पोलिसांनी अपघ ातग्रस्त गाडी बाजुला नेवुन पेट्रोलपंपाजवळ गाडीचा पंचनामा केला, त्या गाडीचे पुर्ण केबिन व बॉक्स तुटलेले होते व चेसी बेंड झालेली होती, तसेच त्यातील स्पेरपार्टस, स्टेअरींग असेम्ब्ली तुटलेली होती, त्याबाबत तुम्हास काय सांगायचे आहे ? |
| उत्तर | खोटे आहे |
| प्रश्न २२ | सदर साक्षीदाराच्या साक्षीमध्ये पुढे असे आले आहे की, त्या गाडीचा क्रमांक एम.एच. १७ बी. डी. ६१८३ असा होता, त्याबाबत तुम्हास काय सांगायचे आहे ? |
| उत्तर | खोटे आहे |
| प्रश्न २३ | सदर साक्षीदाराच्या साक्षीमध्ये पुढे असे आले आहे की, त्यांनी गाडीच्या दिसते परिस्थीतीचा पंचनामा निशाणी २५ वर शाबीत केला आहे, त्याबाबत तुम्हास काय सांगायचे आहे ? |
| उत्तर | खोटा पंचनामा घरबसल्या केला |
| प्रश्न २४ | **साक्षीदार क्र.५ सहाय्यक फौजदार मच्छिंद्र रामभाउ अडकित्ते,** यांच्या साक्षीमध्ये पुढे असे आले आहे की, दि. २७.०६.२०२५ रोजी त्यांची नेमणुक सोनई पोलीस स्टेशन येथे पो.हे.कॉ. या पदावर होती, त्यादिवशी गु.र.नं. २७७/२०२४ चा तपास त्यांच्याकडे भा.द.वि कलम २७९, ३३७, |

| | |
|---|---|
| | ४२७ प्रमाणे आला होता, त्याबाबत तुम्हास काय सांगायचे आहे ? |
| उत्तर | माहिती नाही |
| प्रश्न २५ | सदर साक्षीदाराच्या साक्षीमध्ये पुढे असे आले आहे की, सदरचा तपास पोलीस ठाणे अंमलदार श्री. डी.एम.गावडे यांच्या आदेशाने त्यांच्याकडे आला, याबाबत तुम्हास काय सांगायचे आहे ? |
| उत्तर | माहिती नाही |
| प्रश्न २६ | सदर साक्षीदाराच्या साक्षीमध्ये पुढे असे आले आहे की, त्यांना सदरील आदेश दाखविण्यात आला तो तोच असुन त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे, त्यावर श्री.डी.एम.गावडे यांची सही आहे, ती ते ओळखतात, कारण ते त्यांचे सहकारी आहेत, सबब सदरील आदेशास नि. ३४ देण्यात आली, याबाबत तुम्हास काय सांगायचे आहे ? |
| उत्तर | खोटे आहे |
| प्रश्न २७ | सदर साक्षीदाराच्या साक्षीमध्ये पुढे असे आले आहे की, त्यानंतर त्याने दुस-या दिवशी दोन पंचा समक्षघटनास्थळाचा पंचनामा केला, सदरचे घटनास्थळ हे सोनई घोडेगाव रोड शनिशिंगणापुर कडे जाणारा अरुंद पुलाजवळ होते, याबाबत तुम्हास काय सांगायचे आहे ? |
| उत्तर | खोटे आहे |
| प्रश्न २८ | सदर साक्षीदाराच्या साक्षीमध्ये पुढे असे आले आहे की, त्यांना सदरील घटनास्थळ पंचनामा दाखविण्यात आला, तो तोच असुन त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे, त्यावर त्यांची व दोन पंचाची यांची सही आहे, तो सदरील घटनास्थळ पंचनामा नि.२४ वर आहे, याबाबत तुम्हास काय सांगायचे आहे ? |
| उत्तर | खोटा पंचनामा आहे. |
| प्रश्न २९ | सदर साक्षीदाराच्या साक्षीमध्ये पुढे असे आले आहे की, सदरचा घटनास्थळ पंचनामा त्यांनी पंचासमक्ष केला व लिहीला, त्यानंतर त्यांनी घटनास्थळाचे फोटो काढले व साक्षीदारांचा जबाब नोंदविले, याबाबत तुम्हास काय सांगायचे आहे ? |
| उत्तर | खोटे आहे |
| प्रश्न ३० | सदर साक्षीदाराच्या साक्षीमध्ये पुढे असे आले आहे की, त्यानंतर त्यांनी सोनई पेट्रोलपंपाजवळ अपघातग्रस्त दोन्ही वाहनांचा दोन पंचासमक्ष |

| | |
|---|---|
| | पंचनामा केला, याबाबत तुम्हास काय सांगायचे आहे ? |
| उत्तर | खोटे, पंचनामा केला |
| प्रश्न ३१ | सदर साक्षीदाराच्या साक्षीमध्ये पुढे असे आले आहे की, त्यांना सदरील अपघातग्रस्त वाहनांचे दोन्ही पंचनामे दाखविण्यात आले तेच असुन त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे, त्यावर त्यांची व दोन पंचाची सही आहे, त्यापैकी वाहन क्र. एम.एच.१६ बी.डी. ६१८३ या वाहनाचा पंचनामा नि.२५ वर आहे व वाहन क्र. एम.एच. १७ बी.डी. ८१८१ या वाहनाच्या पंचनाम्यास नि. ३५ देण्यात आली, याबाबत तुम्हास काय सांगायचे आहे ? |
| उत्तर | खोटे आहे |
| प्रश्न ३२ | सदर साक्षीदाराच्या साक्षीमध्ये पुढे असे आले आहे की, त्यानंतर त्यांनी वाहनांचे फोटो काढले व साक्षीदारांचे जबाब नोंदविले, याबाबत तुम्हास काय सांगायचे आहे ? |
| उत्तर | खोटे आहे |
| प्रश्न ३३ | सदर साक्षीदाराच्या साक्षीमध्ये पुढे असे आले आहे की, त्यानंतर त्यांना जखमीचा पुरवणी जबाब प्राप्त झाला, त्यानंतर त्यांनी जखमीचे वैद्यकीय प्रमाणपत्र व तसेच वाहनांची कागदपत्रे हस्तगत केली, याबाबत तुम्हास काय सांगायचे आहे ? |
| उत्तर | खोटे आहे |
| प्रश्न ३४ | सदर साक्षीदाराच्या साक्षीमध्ये पुढे असे आले आहे की, त्यानंतर त्यांनी दोन्ही वाहनांची तांत्रिक तपासणी करून त्यांचा अहवाल दोषरोपपत्रात सामील केला, सदर दोन्ही वाहनांचे तांत्रिक तपासणी अहवाल आरोपीच्या विधीज्ञांनी मान्य केल्यामुळे त्यास नि. २६ व २७ देण्यात आली, याबाबत तुम्हास काय सांगायचे आहे ? |
| उत्तर | खोटा अहवाल सादर केला |
| प्रश्न ३५ | सदर साक्षीदाराच्या साक्षीमध्ये पुढे असे आले आहे की, त्यानंतर त्यांनी आरोपीला फौ.प्र.सं. कलम ४१ (१) प्रमाणे नोटीस दिली, याबाबत तुम्हास काय सांगायचे आहे ? |
| उत्तर | सांगता येणार नाही |
| प्रश्न ३६ | सदर साक्षीदाराच्या साक्षीमध्ये पुढे असे आले आहे की, सदर फौ.प्र.सं. |

| | |
|---|---|
| | कलम ४१ (१) च्या नोटीसीस नि. ३६ वर शाबीत केली आहे, याबाबत तुम्हास काय सांगायचे आहे ? |
| उत्तर | माहित नाही |
| प्रश्न ३७ | सदर साक्षीदाराच्या साक्षीमध्ये पुढे असे आले आहे की, त्यानंतर त्यांनी आरोपीला मो.वा.का.कलम २०९ प्रमाणे नोटीस दिली. सदर नोटीस नि. ३७ वर शाबीत केली आहे, याबाबत तुम्हास काय सांगायचे आहे ? |
| उत्तर | खोटे आहे |
| प्रश्न ३८ | सदर साक्षीदाराच्या साक्षीमध्ये पुढे असे आले आहे की, त्यानंतर त्यांनी सदरील दोन्ही वाहने मॅनेजर बाळासाहेब आढाव राहुरी तालुका दुध संघ व सोपान आव्हाड संगमनेर तालुका दुध संघ यांच्या ताब्यात दिली, याबाबत तुम्हास काय सांगायचे आहे ? |
| उत्तर | माहित नाही |
| प्रश्न ३९ | सदर साक्षीदाराच्या साक्षीमध्ये पुढे असे आले आहे की, त्यांना सदरील दोन्ही बंधपत्र दाखविण्यात आले, ते तेच असुन त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे, त्यावर त्यांची व आरोपीची सही आहे, सबब दोन्ही बंधपत्रास अनुक्रमे नि. ३८ व ३९ देण्यात आली, याबाबत तुम्हास काय सांगायचे आहे ? |
| उत्तर | खोटे आहे |
| प्रश्न ४० | सदर साक्षीदाराच्या साक्षीमध्ये पुढे असे आले आहे की, त्यानंतर त्यांना एम.एल.सी प्राप्त झाली, ती नि.२८ वर असुन आरोपीच्या विधीज्ञांनी मान्य केली आहे, जखमीचे वैद्यकीय प्रमाणपत्र आरोपीच्या विधीज्ञांनी मान्य केल्यामुळे ते नि. २९ व ३० वर आहे, याबाबत तुम्हास काय सांगायचे आहे ? |
| उत्तर | खोटे प्रमाणपत्र आहे |
| प्रश्न ४१ | सदर साक्षीदाराच्या साक्षीमध्ये पुढे असे आले आहे की, त्यानंतर त्यांच्या तपासात असे निष्पन्न झाले की, प्रस्तुतचा गुन्हा तुम्हीच भा.द.वि कलम २७९, ३३७, ३३८, ४२७, मो.वा.का.कलम १८४ व १७७ प्रमाणे केला असुन तुम्ही तुमचे ताब्यातील ट्रक क्र. एम.एच. १७ बी.डी. ८९८१ अविचाराने हयगयीने, रस्त्याच्या परिस्थितीकडे दुर्लक्षकरून चालवुन सोनई ते घोडेगाव जाणारे अरुंद पुलाजवळ समोरून येणारे सहा टायर |

| | |
|---|---|
| | ट्रक एम.एच. १७ बी.डी ६१८३ हीच जोराची धडक देवुन फिर्यादी व जखमीचे कमी व अधिक दुखापतीस कारणीभुत झाला व फिर्यादी व साक्षीदार यांना वैद्यकीय मदत न देता, तेथुन निघुन गेलात, याबाबत तुम्हास काय सांगायचे आहे ? |
| उत्तर | खोटे आहे |
| प्रश्न ४२ | सदर साक्षीदाराच्या साक्षीमध्ये पुढे असे आले आहे की, तुम्ही साक्षी वेळी न्यायालयात हजर होतात, तुम्हाला ते ओळखतात, याबाबत तुम्हास काय सांगायचे आहे ? |
| उत्तर | खोट्या गुन्ह्यात अडकवण्यासाठी खोटे सांगत आहे |
| प्रश्न ४३ | तुम्हाला शपथेवर जबाब नोंदवायचा आहे काय ? |
| उत्तर | नाही |
| प्रश्न ४४ | तुम्हाला तुमच्या बचावासाठी काही पुरावा दयायचा आहे काय ? |
| उत्तर | नाही |
| प्रश्न ४५ | प्रस्तुत खटल्याबद्दल तुम्हास अजुन काही सांगायचे आहे काय ? |
| उत्तर | चुकीचा तपास करुन, चुकीचे दोषारोपपत्र मा. कोर्टात दाखल केले आहे |

...........

आरोपीची सही

( डॉ. पी. आर. सुगांवकर)

दिनांक ०९/०३/२०२६ प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, न्यायालय क्र.१, नेवासा.

<u>प्र मा ण प त्र</u>

याद्वारे प्रमाणित करण्यात येते की, प्रस्तुत आरोपीचा जबाब हा त्याच्या सांगण्याप्रमाणे माझे समक्ष घेण्यात आला व सदरच्या जबाबातील सर्व कथने खरी व बरोबर आहेत.

( डॉ. पी. आर. सुगांवकर)

दिनांक ०९/०३/२०२६ प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, न्यायालय क्र.१, नेवासा.